पुढारी

# वर्ल्ड ट्रेड सेंटरतर्फे मुंबई पोलिसांना १० हजार रेनकोटचे वाटप

**मुंबई :** वर्ल्ड ट्रेड सेंटरचे चेअरमन विजय कलांत्री यांच्यतर्फे मुंबई पोलिसांना १० हजार पावसाळी रेनकोट वाटप करण्यात आले. मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे आणि पोलीस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे-पाटील यांकडे हे रेनकोट सुपूर्द करण्यात आले. यावेळी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे उपाध्यक्ष कॅप्टन सोमेश बात्रा, कार्यकारी संचालक रूपा नाईक व ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजच्या वरिष्ठ संचालिक संगीता जैन हे मान्यवर उपस्थित होते. कलांत्री यांनी केलेल्या मदतीबाबत मुंबई पोलिसांनी आभार मानले आहेत. पोलीस कर्मचारी उनपावसात अविरत कार्यरत आहेत. त्यात कोविड काळही आहे. यामुळे ही मदत त्यांना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

पुण्य नगरी




मुंबई पोलिसांना १०००० पावसाळी रेनकोट वाटप करण्यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे मुंबई चेअरमन, विजय कलांत्री यांच्या वतीने सामाजिक दायित्व अंतर्गत पोलीस आयुक्त हेमंत नगराळे व पोलीस सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) विश्वास नांगरे-पाटील यांना सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी वर्ल्ड ट्रेड सेंटरचे उपाध्यक्ष कॅप्टन सोमेश बात्रा, कार्यकारी संचालक रूपा नाईक व ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजच्या वरिष्ठ संचालिका संगीता जैन उपस्थित होत्या.

सकाळ

# मुंबई पोलिसांना रेनकोटचे वितरण

शिवडी (बातमीदार) : 'वर्ल्ड ट्रेड सेंटर"च्या वतीने मुंबई पोलिसांना १० हजार रेनकोटचे वितरण करण्यात आले. रविवारी (ता. २०) सीएसएमटी येथील पोलिस मुख्यालयात हा कार्यक्रम पार पडला. 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'चे मुंबई अध्यक्ष विजय कलांत्री यांच्या हस्ते पोलिस आयुक्त हेमंत नगराळे व पोलिस सहआयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांच्याकडे हे रेनकोट सुपूर्द करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष कॅप्टन सोमेश बात्रा, कार्यकारी संचालक रूपा नाईक व ऑल इंडिया असोसिएशनच्या वरिष्ठ संचालक संगीता जैन उपस्थित होत्या.